# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 27.12.2025** **वार:शनिवार**

1. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. प्रत्येक क्षेत्रात देशातल्या युवा पिढीसाठी नवीन संधी निर्माण होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. छत्रपती संभाजीनगरच्या अर्णव महर्षि याला राष्ट्रपतींच्या हस्ते राष्टीय बाल पुरस्कार प्रदान
4. दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रु असून प्रत्येकानं त्याविरोधात लढण्याचं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचं आवाहन; आणि
5. महिला क्रिकेटमध्ये भारताचा श्रीलंकेवर विजय; मालिकेत निर्णायक आघाडी

**बालपुरस्कार**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल हा पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. वीर बालदिनानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते काल देशातल्या 20 मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. पुरस्कार विजेत्या मुलांनी शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि इतर आव्हानांवर मात करून विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. या मुलांच्या संकल्प आणि प्रयत्नांमुळे 2047 पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार होईल असा विश्वास राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. पुरस्कारार्थींमध्ये मध्ये 9 मुलं आणि 11 मुलींचा समावेश आहे. यापैकी दोघांना हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

**पंतप्रधान-वीर बालदिवस**

राष्ट्र उभारणीच्या कामी युवा पिढीला केंद्रस्थानी ठेवत युवा सक्षमीकरणावर भर देऊन नवी धोरणं आखली जात आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय वीर बाल दिवस कार्यक्रमात बोलत होते. प्रत्येक क्षेत्रात युवा पिढीसाठी नवीन संधी निर्माण होत असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले....

**आपके पास सीखने के संसाधन है। जो साइंस टेक स्टार्टअप वर्ल्ड में जाना चाहते हैं उनके लिए स्टार्ट उप इंडिया जैसे मिशन है जो स्पोर्ट्स में आगे बढ़ रहे हैं उनके लिए खेलो इंडिया मिशन है। ऐसे तमाम मंच। आपको आगे बढ़ाने के लिए है। आपको बस फोकस रहना है और इसके लिए ज़रूरी हैकी आप short term popularity की चमक दमक में ना फंसे।**

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी छत्रपती संभाजीनगरमधल्या 17 वर्षीय अर्णव महर्षीला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्धांगवायूच्या रुग्णांच्या हातांसाठी AI-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड त्यानं तयार केले आहेत. पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना अर्णव म्हणाला....

**ये इनोवेशंस मेरे खुद के रिकवरी के प्रोसेस के थ्रोग डेवलप हुआ है। मैं खुद पैरालाइज्ड था मेरे डोमिनेंट राइट साइड पे और ये जो इनोवेशंस है पैरलाइज पेशेंट्स और सेरेब्रल पॉलिसी पेशेंट्स के लिए बना है उनके इंप्रूव उनकी रिकवरी को फास्ट करने के लिए और बेटर करने के लिए और मैं मेरा फ्यूचर तो मैं यही देखता हूँ इसे और लार्ज स्केल पे डिप्लॉय करने के लिए और इसे हर एक पेशेंट को एक्सेस देने के लिए और एक्सेसिबल बनाने के लिए।**

**वीरबाल दिवस-मुख्यमंत्री**

साहिबजाद्यांच्या धैर्यानं आणि बलिदानानं भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचं शौर्य पिढ्यान्‌पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईत वीर बाल दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. शीख पंथीयांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग यांच्या अद्वितीय शौर्य आणि बलिदानाच्या स्मरणार्थ 26 डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो. राज्यातही विविध ठिकाणी वीर बाल दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**अमित शहा**

दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रु असून प्रत्येकानं मिळून त्याविरोधात लढणं गरजेचं आहे असं आवाहन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. देशातला दहशतवाद निपटून काढण्यासाठी केंद्र सरकार कठोर पावलं उचलत आहे, असंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएतर्फे आयोजित दहशतवादविरोधी परिषदेचं उद्घाटन काल शहा यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. दहशतवादविरोधी कारवाईत योगदान देणाऱ्या नऊ एनआयए कर्मचाऱ्यांचा शहा यांच्या हस्ते सेवा पदक आणि वीरता पदक देऊन गौरव करण्यात आला.

**जीरामजी**

2047 पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजिविका अभियान अर्थात व्हीबीजीरामजी योजनेच्या माध्यमातून गावांमध्ये विकासकामं केली जाणार आहेत असं केंद्रिय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं. डीडी न्यूज या वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना ते म्हणाले.....

**पिछले गाँव में विकास के सारे काम इस योजना के माध्यम से किए जाएँगे। अब ये तय कर दिया गया है कि ग्रामवासी ग्राम सभा और पंचायत मिलके तय करेगी की कौन-से काम होना है जो उनकी जरूरत के है गाँव काम तय करेगा और ग्राम। पंचायती पचास पेर सेंट कम से कम काम करेगी। मजदूरों का भी हित और किसानों का भी ठीक से काम चले और विकास के काम हो तो गाँव का भी भला हो जाए और आजीब का मूलक गतिविधियों से रोजगार के अवसर बढ़ जाए। इतनी अच्छी योजना बनी है। मुझे लगता है सबको इसका स्वागत करना चाहिए।**

दरम्यान सांगली जिल्ह्यात समडोळी गावात काल व्हीबीजीरामजी कायद्याबाबत जनजागृतीसाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी या ग्रामसभेत मार्गदर्शन केलं. ग्रामपंचायतींमध्ये पारदर्शक, लोकाभिमुख आणि उत्तरदायी प्रशासन निर्माण करणं हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायतींनी गावाचा विकास करावा, असं आवाहन पुलकुंडवार यांनी केलं.

**महापालिका**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. पुण्याचे माजी महापौर आणि नुकताच राजीनामा दिलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पक्षाच्या पुण्यातल्या अनेक पदाधिकाऱ्यांसह काल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जगताप आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं पक्षात स्वागत केलं. आगामी महापालिका निवडणुकीसाठी 'काँग्रेस लढणार, महाराष्ट्र जिंकणार', या संकल्पवाक्याचं प्रकाशनही यावेळी करण्यात आलं.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून बाहेर पडलेले प्रकाश महाजन यांनी काल ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आपण पद किंवा उमेदवारीसाठी मागणी न करता शिवसेनेत प्रवेश केला असल्याचं महाजन यांनी बातमीदाराशी बोलताना सांगितलं. ते शिवसेनेचे प्रवक्ते असतील, असं शिंदे यांनी सांगितलं. मराठवाड्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची युती अंतिम टप्प्यात आली असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल छत्रपती संभाजी नगर इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<u>सायकलिंग स्पर्धा</u>**

पुणे ग्रँड टूर चॅलेंज सायकलिंग स्पर्धा येत्या 19 ते 23 जानेवारी दरम्यान होणार आहे. 'इंडिया A' आणि 'इंडिया B' असे भारताचे दोन राष्ट्रीय संघ स्पर्धेत सहभागी होणार असून इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चीन, मलेशिया, इंडोनेशिया आणि थायलंडच्या संघांनी स्पर्धेतला आपला सहभाग निश्चित केला आहे. या स्पर्धेविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**चार टप्प्यांची ही खडतर स्पर्धा 437 किमीच्या मार्गावरून होणार असून, पुण्याच्या नागरी परिसरातून, वारसा-संपन्न स्थळांमधून आणि रमणीय ग्रामीण प्रदेशातून प्रवास करणार आहे. या जागतिक स्पर्धेमुळे ग्रामीण पर्यटनालाही अर्थकारण बळकट होणार आहे. स्पर्धेचा निकालपहिला टप्पा मुळशी मावळ असून हा मार्ग 91.8 किलो मीटरचा असेल. दुसरा टप्पा पुरंदर सिंहगड खडकवासला परिसराचा 109.15 किलो मीटरचा असेल. तर पश्चिम घाटाचा 137 किलोमीटरचा तिसरा टप्पा असेल. अखेरचा टप्पा हा पुणे प्राइड लूप या नावाने ओळखला जाणार असून 100 किलोमीटरच्या परिघात शहराचं सांस्कृतिक आणि भौगोलिक वैभवाचे दर्शन या स्पर्धेच्या निमित्ताने होणार आहे. जागतिक सायकलिंग वार्षिक दिनदर्शिकेची सुरुवात या स्पर्धेतून होणार आहे. नववर्षाच्या प्रारंभीच होणारी ही स्पर्धा पुण्याच्याच नव्हे तर देशाच्या क्रीडा विश्वाला नवी ऊर्जा देणारी ठरेल यात शंका नाही. आकाशवाणी बातम्यांसाठी सीमा चोरडिया.**

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, काल रात्री तिरुअनंतपुरम इथं झालेल्या तिसऱ्या टी-20 सामन्यात, भारतानं श्रीलंकेचा आठ खेळाडू राखून पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत 3-0 अशी निर्णायक आघाडी घेतली. 113 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, शेफाली वर्माच्या 42 चेंडूत नाबाद 79 धावांच्या जोरावर भारतानं 13 षटकं आणि 2 चेंडूत 115 धावा केल्या. रेणुका सिंग ठाकूरनं चार खेळाडू बाद केले. तिला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

राज्यात काल अनेक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट नोंदवण्यात आली. आजही मध्य महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात घट होईल. तसंच राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.